# मुंबईचे दिवस

न्या. नरेन्द्र चपळगावकर

मुंबईला वकिलीला जाण्याचा विचार मनात नक्की झाला तरी जाणे सोपे नव्हते. एव्हाना आम्हाला चार मुले झाली होती. सर्वात धाकटा श्रीधर तर अवघ्या एक वर्षाचा होता. बीडला वकिली बऱ्यापैकी असली तरी मागे पडलेली शिल्लक अजिबात नव्हती. एका ठिकाणी स्थिर झालेला व्यवसाय सोडून चाळीशीनंतर नवे साहस करावयाचे होते. नंदिनी-माझी पत्नी-कितपत अनुकूल असेल व तिला हा बदल मानवेल का ही ही शंका होती. पण तिला विचारताच 'तुम्ही खुशाल मुंबईला जा. मुलींच्या शाळा चालू आहेत. काही दिवस मी व मुले येथेच राहू. तेथली व्यवस्था झाली म्हणजे आम्ही येऊ' असे तिने सांगितले. तिची संमती ही फारच मोठी गोष्ट होती. नंदिनी व मुले बीडलाच राहणार तर तेथल्या खर्चाची काही तरतूद करणे आवश्यक होते. काका अजून वकिली करीत असले तरी सर्व भार त्यांच्यावर टाकणे अयोग्य होते.

डॉ. गोविंद जोशी हा बीडला वैद्यकीय व्यवसाय करीत असलेला माझा मित्र. दररोज त्याच्या दवाखान्यात गप्पा मारण्यासाठी माझी चक्कर असावयाची. समवयस्क असल्याने जोशी पती- पत्नी व आम्ही दोघे अनेकवेळा एकत्र जमत असू. शनिवारी त्याच्या दवाखान्याला सुटी असल्यामुळे अधुनमधून एकत्र जेवणेही होत. गोविंदला मी मुंबईला प्रॅक्टिसला जाण्याचा माझा विचार सांगितला तेव्हा त्यानेही माझा उत्साह वाढवला. बोलण्याच्या ओघात 'बीडचे उत्पन्न बंद होणार व येथला खर्च तर चालवावाच लागेल. मुंबईची प्राप्ती तर अद्याप अनिश्चितच' असे मी म्हणालो. डॉक्टर म्हणाला, 'इथील चिंता करू नकोस. दरमहा लागणाऱ्या किमान घरखर्चाची रक्कम किती होते?' मी ढोबळ हिशेब करून दोन हजारांचा आकडा सांगितला. तो म्हणाला, 'दर महिन्याच्या एक तारखेला दोन हजार रुपये वहिनींच्याकडे न चुकता पोहचते होतील. तू फक्त मुंबईची काळजी कर.' गोविंदच्या या आश्वासनाने मला फार आधार वाटला. मला मुंबईत गेल्याबरोबर कामे व पैसे मिळत गेले त्यामुळे डॉ. जोशींचे पैसे घेण्याचा प्रसंग आला नाही. परंतु त्याने दाखवलेला जिव्हाळा लाख मोलाचा होता.

याउलट दुसरा एक अनुभव सांगितला पाहिजे. माझ्या एका मित्राच्या कौटुंबिक गरजेसाठी मी माझ्या नावावर कर्ज घेऊन त्यांना पैसे दिले होते, ते त्यानंतर नंतर परत केले. परंतु मी मुंबईला असताना नंदिनीस काही तातडीची गरज पडली तेव्हा तिने त्यांच्याकडे उसने पैसे मागितले व मी आल्यावर परत करीन असे सांगितले; पण त्यांनी तिला पैसे दिले नाहीत.

मुंबईला पहिला प्रश्न राहण्याच्या जागेचा उभा राहणार होता. भाड्याची जागा मिळणे सोपे नव्हते. तात्पुरते आमदार निवासात एखाद्या आमदाराच्या खोलीत महिना- पंधरा दिवस राहता येईल असा विचार मनात आला. माझ्या माहितीचे दोन- तीन जण असेच आमदार निवासात राहत होते. शिक्षक मतदारसंघातून निवडून आलेले माझ्याच जिल्ह्यातले स्नेही आमदार डी.के. देशमुख यांनी मी मुंबईत येणार आहे कळताच स्वत:होऊन 'माझ्या खोलीत रहा' असा देकार दिला. मी त्याप्रमाणे त्यांच्या खोलीत बस्तान ठेवले. आमदाराच्या खोलीत बरीच वर्दळ असते. त्याचा मला त्रास होऊ नये म्हणून डी.के. आणि जनता पक्षाचे वसमतचे आमदार पंडितराव देशमुख या दोघांनी एकाच खोलीत एकत्र राहण्याचे ठरवले व त्यांच्या नावावरची दुसरी खोली स्वतंत्रपणे मला दिली. त्यामुळे मला निर्वेध अभ्यास करता येऊ लागला.

त्याचवेळी बीडहून मुंबईला वकिलीसाठी येणाऱ्या सुधाकर देशमुखचा भाऊ मुंबईला ठाण्याला राहत होता. सुधाकरची त्यामुळे अडचण नव्हती. मी जागेचा शोध करू लागलो. अचानक एके दिवशी बीडचे एक डॉक्टर स्नेही प्रभाकरराव खरवडकर यांचे पत्र आले की, त्यांचा भाऊ प्रकाश याचा एक फ्लॅट मुलुंडला आहे व तो रिकामा आहे. तो मला हवा असल्यास प्रकाश तो मला देऊ इच्छितो. योगायोग असा झाला होता की, आकाशवाणीच्या परभणी केंद्रावरून प्रक्षेपित झालेले माझे एक भाषण चंडीगडला

प्रकाशला ऐकू आले होते. त्याने भावाकडे माझ्याबद्दल सहज चौकशी केली असता मी मुंबईला नुकताच गेलो आहे असे त्याला कळाले. 'चपळगावकरांना जागा मिळाली का? नसेल तर माझा फ्लॅट रिकामा आहे तो त्यांना देऊ' असे त्याने भावाला कळवले होते.

एके दिवशी कोर्टात काम संपल्यावर सुधाकरच्या बरोबर मरणाच्या गर्दीत लोकलच्या दुसऱ्या वर्गातून मुलुंडला जाऊन जागा पाहून आलो. पूर्व मुलुंडच्या चांगल्या वस्तीत तीन खोल्यांचा फ्लॅट होता. स्टेशनपासून पायी ४/५ मिनिटांच्या रस्त्यावरची ही जागा घेतल्याचे कळवले आणि बीडला जाऊन काही आवश्यक सामान घेऊन आलो.

मुंबईत जागा मिळाली तीही पागडी न देताना आणि अगदी योग्य भाड्याने, ही फार आनंदाची गोष्ट होतीच; पण कुठे तरी असे मनात होते की आपण मोठ्या जागेत एखाद्या बंगल्यात मग कौलारू का असेना राहावे. शेजारी काही नारळाची, माडाची झाडे असावीत. असे घर मुंबईत कुठे मिळणार? मी रेल्वेने येता- जाताना कर्जत पाहिले होते. कर्जतहून दोन-तीन वकील रोज रेल्वेने उच्च न्यायालयात येत. आपणही कर्जतला अशी एखादी एकर जागा घ्यावी व त्यात छोटे घर बांधून राहावे असे स्वप्न काही दिवस मनात बाळगले होते. त्याबद्दल काही हालचाल करता येण्यापूर्वीच मुंबईचे वास्तव्य संपले.

मुंबई-बीड रात्रभर प्रवासाने खूप थकवा येई; पण तोच सोयीचा असे. दर पंधरा दिवसांनी मी बीडला जाई. अशा रातराण्या सुरू होण्यापूर्वी औरंगाबाद किंवा जालन्याला बीडहून बसने व तेथून रेल्वेने मनमाडला व पुन:गाडी बदलून मुंबईला जावे लागे. या सगळ्या प्रवासात रिझर्व्हेशन वगैरेचा संबंध नसे. मनमाड मुंबई प्रवासाचा बराच भाग गर्दीमुळे उभ्याने व तोही बहुधा स्वच्छतागृहाच्याजवळ उभे राहून करावा लागे.

उच्च न्यायालयात प्रत्यक्ष काम करण्यापूर्वी तेथील कामकाजपद्धतीची थोडीफार माहिती झाली होती. माझ्या पक्षकारांची अपील मुंबईत दाखल करण्यास तेथील वकिलांना दिली तरी काही वेळा त्या अपीलांचे कच्चे मसुदे मीच लिहून देत असे. त्यामुळे मुंबईच्या व्यस्त वकिलांनाही मदत होई. शपथपत्रासाठी अर्जाचे मसुदे मुंबईहून आले म्हणजे तेही वाचण्यात येत. माझे ऑफिसचे बहुतेक काम मुरलीधर कानडे यांना मी देत असे. कानडे माझ्या वडलांच्या बरोबर चळवळीत आलेले विद्यार्थी. काकांनी त्यांना राजकारण आणि त्यांनी मला मूळाक्षरे शिकविली होती. दादरला पोर्तुगीज चर्चजवळ 'सहजीवन' सोसायटीत त्यांचे घर होते. माझा मुक्काम त्यांच्याच घरी होई. रात्री जेवणे झाल्यावर बीडच्या आठवणी काढत पहाटेपर्यंत गप्पा होत.

मी मुंबईस गेलो तेव्हा मराठवाड्यातील २०-२५ वकील मुंबईत वकिली करीत होते. त्यातले ५-६ हैदराबाद उच्च न्यायालयात वकिली करत होते व राज्यपुनर्रचनेनंतर मुंबईस आले होते. इतरांनी मुंबईतच वकिली सुरू केली होती. ३/४ जणांचा अपवाद वगळता इतराकडे स्वाभाविकपणे मराठवाड्यातलेच काम होते. या भागातले पक्षकार सामान्यपणे तुलनेने गरीब असत व प्रकरणांतील मालमत्ताही फार मोठी नसे. अगदी किरकोळ प्रकरणे मुंबईत दाखल करणेही काही पक्षकारांना परवडत नसे. मात्र काही वकील अगदीच नाममात्र फी घेऊनही पक्षकारांची प्रकरणे दाखल करीत व चालवीत. हैदराबादहून मुंबईत राज्यपुनर्रचनेमुळे गेलेल्या वकिलांना अनेक अडचणी सोसून आपल्या वकिलीचा संसार नव्याने उभा करावा लागला.

मी अचानक मुंबईत वकिलीस आलो होतो यामुळे काही मित्रांच्या मनात एक शक्यता डोकावली. माझा पक्ष व माझी काही मित्रमंडळी सत्तेवर आली होती. तेव्हा त्यांनी मनाशी काही योजून मला मुंबईत बोलावून घेतले असावे असे काहींना वाटले. आपल्या पक्षातल्या सहकाऱ्यांच्या क्षमतेचा चांगला उपयोग करून घेण्यासाठी सत्ता राबवता येते. मात्र असल्या किरकोळ गोष्टी सत्ताधारी झालेल्या आमच्या मित्रांच्या मनातच येणे शक्य नव्हते. मी या समजाचे ताबडतोब निराकरण केले. पुढे काही दिवसांनी मी जर सरकारी वकील झालो तर मला विविध खटल्यांचा अनुभव मिळेल म्हणून एका न्यायाधीशांनी मला तशी सूचना केली. सत्तेतल्या मित्रांच्या कानावर तेही घालण्यात आले. परंतु इतर कामाच्या व्यापात

याकडे लक्ष देण्यास त्यांना वेळ मिळू शकला नाही. नंतर काही महिन्यांनी तर औटघटकेची ही सत्ताच आमच्या हातून गेली.

पक्षातल्या मित्रांच्या या अलिप्त वृत्तीला एक मात्र अपवाद होता; तो म्हणजे मृणाल गोरे. माझी एकदा भेट झाली असता राहायला जागा कुठे मिळाली आहे, अशी त्यांनी चौकशी केली. सध्या मी मुलुंडला भाड्याच्या घरात राहतो आहे असे कळाल्यानंतर मुलुंडमध्ये शक्यतर एखादा फ्लॅट विकत घ्यावा असे त्यांनी सुचविले. मुलुंडमधील आपल्या एका सहकारी कार्यकर्त्याला-मधु जोशींना-त्यांनी मुद्दाम माझ्याकडे पाठवले. चांगल्या व योग्य किमतीच्या फ्लॅटच्या शोधास मला मदत करण्यास जोशी माझ्याबरोबर दोन- तीन ठिकाणी आले. त्यावेळी फ्लॅटच्या किमती पूर्व मुलुंडमध्ये दर चौरसफुटास २२५ रुपये अशा होत्या. मृणालताई आणि जोशी यांच्यामुळे हा दर दोनशे रुपयांपर्यंत कमी करण्याचीही काहींनी तयारी दर्शविली. परंतु माझ्याजवळ दोनशे रुपयाप्रमाणे होणारी रक्कमही नव्हती. मी मुंबई सोडली त्यावेळी ही किमत दुपटीपेक्षा अधिक झाली होती. वासू भट्टाचार्यांच्या 'गृहप्रवेश' या चित्रपटाचे कथानक आठवावे असा अनुभव मलाही आला. दोनशे रुपयेप्रमाणे किंमत देण्याची ऐपत आली तेव्हा किमती चारशे रुपये झाल्या आणि चारशेची ऐपत आली तेव्हा त्या आठशेपर्यंत जाऊन पोहोचल्या होत्या.

मुलुंडचे वातावरण फार चांगले होते. आमच्या 'वात्सल्य' इमारतीत माझा पूर्वपरिचय असलेली महाजन, शिकारखाने वगैरे २-३ कुटुंबे होती. मी एकटाच राहत असल्यामुळे शेजारच्या फ्लॅटमध्ये राहणारे मसूरकर नावाचे कुटुंबिय तर मला आठवड्यातून चार-दोन वेळा तरी जेवायास बोलावीत. २-३ दिवसांच्या अनुभवाने सकाळी ९.८ ची लोकल सोयीची आहे असे मला दिसले. मुलुंडचे २-३ वकीलही त्याच लोकलमध्ये असत. माझा नंतर विशेष स्नेह झालेले अशोक हळबे हे त्याच गाडीत असत. तासाभराच्या प्रवासानंतर व्ही.टी. येई. पहिल्या वर्गाचा पास असला तरी त्याचा उपयोग चेंगरले जाऊ नये एवढाच होई व प्रवास उभ्यानेच करावा लागे. त्यातही भली मोठी बॅग सांभाळावी लागे.

लोकलने येण्याजाण्यात साधारणत: दोन-अडीच तास दररोज जात. हा काळ सुसह्य व्हावा असे अनेक उपाय लोक शोधीत. ज्याच्या गावापासूनच गाडी निघे त्यांना बसायला जागा मिळे आणि ते गाडीत वाचनसुद्धा करू शकत. काही मंडळी उभे राहूनच भजन करीत, गाणी म्हणत, पत्तेही खेळत आणि वेळ कारणी लावीत. मुलुंडहून निघणाऱ्या दहा- बारा गृहिणींनी 'उप्रम' नावाचे एक मंडळच स्थापन केले होते. उप्रम म्हणजे उभ्याने प्रवास करणाऱ्या महिला. गाडीत गाणीच नव्हे तर काही संवादही त्यांनी बसवले होते. ते एवढे रंजक होते की त्यांच्या लोकलमधील या कार्यक्रमाचे जाहीर प्रयोगही काही ठिकाणी झाले.

मुंबईची लोकल हा एक आपली सोय करणारा त्याचबरोबर जीवनाच्या अनिश्चिततेचे सतत स्मरण देणारा अनुभव असतो. लोकलखाली एखादा माणूस कापला गेल्यानंतर त्याच्या देहाचे तुकडे फ्लॅटफॉर्मवर ठेऊन ५-६ मिनिटात गाडी पुन: चालू लागे हे प्रथम पाहताना विचित्र वाटले. पण तिलाही छातीवर दगड ठेऊन कर्तव्य चालू ठेवावे लागे. मुंबईत मला भेटावयास येणारे वकील आणि पक्षकार प्रारंभी सरळ उच्च न्यायालयातच येत. ते सापडायला सोपे. जालन्याचे असेच एक मुंबईत नवखे असलेले वकील मला तेथे भेटले व माझ्या घरी येऊन प्रकरणाबद्दल चर्चा करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. माझा रेल्वेचा पास पहिल्या वर्गाचा होता. वकीलसाहेब दुसऱ्या वर्गाचे तिकीट काढून रेल्वेत बसले. त्यांना मुलुंड स्टेशनवर उतरून फ्लॅटफॉर्मवरच थांबावयास मी सांगितले होते. दुर्दैवाने या गाडीतील एका डब्यास मधेच आग लागली. त्यामुळे गाडी दादरजवळ थांबवण्यात आली. त्यानंतर आग विझवून व डबा मोकळा करून गाडी पुढे निघाली. मी मुलुंडला पोहोचलो तेव्हा फ्लॅटफॉर्मवर वकीलसाहेब दिसेचनात. शेवटी बराच वेळ शोध करून मी घरी आलो. आमच्या इमारतीच्या जिन्याखाली ते वकीलसाहेब माझी वाट पाहत उभे होते. कोणी तरी मार्गदर्शन केल्याप्रमाणे लगेच दुसरी लोकल धरून ते आले होते. एकटे घरी यावयास थोडेसे घाबरणाऱ्या वकीलसाहेबांना अचानकपणे एकट्यानेच प्रवास करून घर शोधावे लागले होते. वकीलासारखा माणूसही मुंबईला अपरिचित असेल तर त्याला थोडी भीती वाटत असे.

पक्षकारांची अवस्था तर सहज कळण्यासारखी आहे. मुंबईला स्वत: येण्यास अनेक पक्षकार नाखुश असत. बरोबर येणारा वकील कायद्याची मदत देण्याबरोबरच मुंबईत सोबत करण्यासाठीही असे. अशी सोबत नसलेले काही पक्षकार सकाळी माझी भेट झाली म्हणजे कागदपत्र स्वाधीन करून लगेच मला सांगत की आम्हाला बसमध्ये बसवून देण्यासाठी कोणाला तरी सांगा. माझ्या कारकूनाला बसस्थानकापर्यंत येण्याची विनंती करीत व त्याला परतीसाठी टॅक्सीचे पैसे देत. योगायोगाने मुंबईतच राहण्याची पाळी पुढे आली; परंतु मीच मुंबईला प्रथम थोडा घाबरत असे. अठ्ठावन साली मालवणला साहित्य संमेलन झाले. ते आटोपून परत जाताना अमर शेखांनी त्यांच्याजवळचे बोटीचे तिकीट मला दिले. त्यांना काही कारणाने मालवण जवळच दुसरीकडे जावयाचे होते. या तिकीटावर मी बोटीने प्रवास केला; पण भाऊच्या धक्क्यावर बोट थांबल्यावर टॅक्सी करून सरळ बोरीबंदर गाठले आणि गावी परत गेलो. मुंबई पाहण्यासाठी थांबण्याच्या मित्रांच्या सूचना मी मानण्याचे धैर्य झाले नाही.

मुंबईचे रहिवासी एकमेकांना संकटकाळी तत्परतेने मदत करतात असा मात्र अनुभव आहे. दादर स्थानकात उभ्या असलेल्या एका लोकलवर दुसरी लोकल अक्षरश: चढली. त्यात लोकलच्या पहिल्या स्त्रियांच्या डब्याचा चुराडा झाला. आमच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या एका मुस्लिम कुटुंबातील मुलगी सामान्यत: त्या लोकलने येई. ती घरी आली नाही यामुळे कुटुंबीय हवालदिल होते. सर्व फ्लॅटमधील पुरुष मंडळी मुलुंड, ठाणे आणि आसपासच्या रेल्वेस्थानकावर शोध घेण्यास गेली. त्या मुलीच्या कुटुंबाची काळजी सगळ्याच शेजाऱ्यांनी वाटून घेतली होती. मुलगी बस मिळवून पवईमार्गे सुखरूप आली.

एकदा मुंबईच्या लोकलने मलाच माझ्या जीवनातला एक अनोखा अनुभव दिला. एके दिवशी मी सुटी असल्यामुळे माझ्या घरीच काही काम करत बसलो होतो. माझा मित्र सुधाकर याचा मुंबईतच तेव्हा असलेला मुलगा तेथे आला व दार उघडेपर्यंतही न थांबता 'काका, तुम्ही आहात का?' असा प्रश्न वारंवार विचारू लागला. दार उघडून पाहतो तो राजूला धाप लागली आहे व मला पाहून तो आश्चर्यचकित आहे. तो म्हणाला, 'तुम्हाला अपघात झाला आहे, असे बाबांना कळाले आहे. तुम्ही आता आमच्याकडे चला.' मी सुधाकरकडे गेलो तेव्हा त्याने सांगितले की काल चेंबूरजवळच्या रेवली स्थानकावर दोन रेल्वे गाड्यात टक्कर झाली आणि त्यात आठ- दहा माणसे मृत्युमुखी पडली आहेत. मृतांच्या यादीत माझेही नाव आहे. मुंबईच्या इंग्रजी सायंदैनिकांनी मृतांची यादी छापली होती व त्यात 'एन. चपळगावकर' असे नाव होते. काही परिचितांनी मृतदेह कोठे आहे व अंत्ययात्रेची वेळ वगैरे चौकशीला प्रारंभ केला होता. हीच बातमी जर बीडला जाणाऱ्या वृत्तपत्रात सकाळी आली असेल तर घरी काय घडले असेल याची मी चिंता करू लागलो. सुधाकरचा मोठा भाऊ राज्य पोलिस मुख्यालयात अधिकारी होता. त्यानेच ही बातमी सुधाकरला कळवली होती. त्याला पुन्हा निरोप करून विनंती केली की बिनतारी संदेशाद्वारे बीड पोलिसांना कळवा की मी सुखरूप आहे व हा निरोप माझ्या घरी माणूस पाठवून आई- वडलांना द्या. सुदैवाने संदेश दळणवळणाच्या कामावर त्यावेळी यादव नावाचे बीड जिल्ह्यात पूर्वी असलेले एक पोलिस अधिकारी होते. त्यांनी तशी व्यवस्था केली व घरी निरोप वडलांना दिल्याचे मला पुन्हा लगेच सांगितले. त्यावेळी दूरध्वनींचे एवढे जाळे नव्हते आणि मोबाईल तर अस्तित्वातच नव्हते. 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' या उक्तीचा अनुभव थोडाफार त्या दिवशी आला.

मुंबईचा पाऊस तेथले दळणवळण अनेकवेळा पूर्णपणे थांबवतो. कर्मचारी कार्यालयात येऊ शकत नाहीत. तीच गोष्ट व्यावसायिकांची होते. तरीही काम तर चालवावेच लागते. एकदा घाटकोपरला पाणी साचल्यामुळे रेल्वे तेथेच थांबल्या. माझे एक प्रकरण अंतिम सुनावणीसाठी होते. त्यामुळे मी स्टेशन बाहेर येऊन टॅक्सी घेतली आणि दीडशे रुपये खर्च करून उच्च न्यायालयात गेलो. फारच थोडे वकील आले होते आणि मला पाहून न्यायाधीशांना निदान एक प्रकरण चालणार अशी आशा वाटू लागली. मी रिट अर्जदार होतो. विरुद्ध बाजूला सुधाकर देशमुखच होता. तो येऊ शकला नाही असे मी सांगून पाहिले; परंतु न्या. व्यंकटराव देशपांडे आणि न्या. नाईक या दोघांनी माझ्या विनंतीकडे लक्ष दिले नाही. तुम्ही

तर तुमचे विवेचन करा असे मला सांगितल्यानंतर मी माझी बाजू मांडली. त्यानंतर ते म्हणाले, आता तुम्ही तुमच्या गैरहजर मित्राची बाजू मांडा आणि त्यांनी प्रतिपक्षाची बाजूही मलाच मांडावयास लावली. नंतर त्यांनी लगेच निकालपत्र सांगितले आणि माझा अर्ज नामंजूर करून सुधाकरसारखा निकाल दिला.

वेस्टर्न इंडिया ॲडव्होकेटस् असोसिएशन या अपील शाखेच्या वकिलांच्या संघटनेचे सभासदत्व मी स्वीकारले होते. या संस्थेच्या वकिलांना बसण्यासाठी दिलेली खोली क्र. ३२ मात्र गच्च भरली होती. शेजारीच कीर्तीकर लायब्ररीत मी बसण्यास सुरुवात केली. तेथे मराठवाड्यातील रा.गो. भादेकर, गोविंदराव देशपांडे असे काही बसत होते. गैरसोय एकच होती की चहा मात्र ग्रंथालयाबाहेर व्हरांड्यात जाऊन घ्यावा लागे. या व्हरांड्यात बसणाऱ्या वकिलात न्यायखात्यात बरीच वर्षे नोकरी करून नंतर वकील झालेले चनबसप्पा सोळसेही होती. अतिशय कष्टाने शिक्षण घेतलेले सोळसे मुलुंडलाच राहत. कधी माझ्यासाठीही जेवणाचा डबा आणत. काम संपल्यावर परतताना कित्येकदा बरोबर असत.

उच्च न्यायालयात मी चालवलेले पहिलेच प्रकरण चोरीबद्दल सहा महिन्याची शिक्षा झालेल्या आरोपीचे होते. प्रकरण दाखल करवून घेतले जाऊन पक्षकाराला जामीनावर सोडवण्याची मला घाई होती. मात्र ते ताबडतोब 'ॲडमिट' न करता न्या. प्रतापांनी त्यात 'दाखल का करून घेऊ नये' याची विचारणा करणारी नोटीस काढली. पक्षकाराला ताबडतोब जामीन मिळाला नाही, त्यामुळे मी थोडा नाराज होतो. शेजारी बसलेल्या गुमास्ते या ज्येष्ठ वकिलांनी मला समजावून सांगितले की, रिव्हीजन दाखल करून घेऊन दीर्घकाळ प्रलंबित ठेवण्याऐवजी त्याचा लगेच निकाल देण्याचा न्यायाधीशांचा विचार आहे असे दिसते. आठच दिवसानंतरची तारखी न्या. प्रतापांनी दिली होती. त्या दिवशी खालच्या कोर्टाचे रेकॉर्ड आले. मी आणि सरकारी वकील यांचे जुजबी विवेचन झाल्यावर आरोपीने भोगलेली पंधरा दिवसांची शिक्षा पुरेशी आहे असे ठरवून त्या. प्रतापांनी रिव्हजन अंशत: मजूर केले व मला यश मिळाले. न्यायाधीशांच्या या दृष्टिकोनामागे पहिलाच गुन्हा करणाऱ्या त्या आरोपीबद्दल दया व उच्च न्यायालयात प्रथमच केस चालवणाऱ्या वकिलाबद्दल थोडी सहानुभूती अशा दोन्ही गोष्टी असण्याची शक्यता होती.

मी मुंबईत वकिली करू लागलो आहे हे परिचितांना कळताच हळूहळू कामे येण्याला सुरुवात झाली. दर महिन्याला ५-६ नवी प्रकरणे येत असत. सार्वजनिक कामाच्या निमित्ताने माझ्या मराठवाडाभर असलेल्या ओळखींचा अर्थातच उपयोग झाला. मजकडे येणारे काम बहुतेक नव्याने दाखल होणारे असल्यामुळे सकाळीच पहिल्या एक- दोन तासात माझे काम संपे. प्रकरण दाखल करून घ्यावयाचे की नाही याची प्राथमिक सुनावणी साधारणत: पाच-सात मिनिटांत आटोपे. न्यायाधीश घरी वाचून येत व काही संकेत ठरलेले असत. दिवाणी किंवा फौजदारी प्रकरणातील पहिले अपील हा अपील करणाराचा अधिकार असल्यामुळे ते दाखल करून घ्यावयाचेच असे मानले जाई; त्यामुळे त्यात वेळ घालवण्याची गरज नसे. Admit किंवा Rule असा त्यावर आदेश होऊन फक्त अंतरिम मागणीबद्दल वकिलांना प्रश्न विचारले जात. ३-४ मिनिटांत त्याचाही निर्णय हाई. रिटअर्ज किंवा रिव्हीजन यामध्ये याचिकाकर्त्याच्या वकिलाचे म्हणणे ऐकले जाई. त्यातही उच्च न्यायालयाने कोणत्या प्रकरणात हस्तक्षेप करावा याबद्दलचे संकेत सामान्यत: पाळले जात. काही न्यायाधीशांचा-त्यांची संख्या बरीच होती- कामाचा वेग इतका असे की प्राथमिक सुनावणीची ६०-७० प्रकरणे एका दिवसात संपत. एवढा वेग असूनही निर्णय अयोग्य झाला असे सहसा होत नसे. ज्या प्रकरणात थोडा विचार करण्यासारखा मुद्दा असेल ते प्रकरण दाखल करून घेण्याकडे बहुतेकांचा कल असे. न्यायाधीशाच्या न्यायकल्पना स्पष्ट असतील, त्याची कायद्याची व मानवी व्यवहाराबद्दलची समज चांगली असेल तर अपवादात्मक प्रकरणे वगळता सुनावणीला वेळ लागण्याचे कारण नसते. अगदी राज्यघटनेच्या अर्थाबद्दलचा किंवा दोन किंवा अधिक न्यायनिर्णयांनी घेतलेल्या भिन्न भूमिकातून निवड करण्याचा प्रश्न असेल तर गोष्ट वेगळी. माझेच एक प्राथमिक सुनावणीचे प्रकरण मात्र तत्कालीन मुख्य न्यायाधीश बी.एन. देशमुख यांच्यासमोर दिवसभर चालले. प्रकरण कोणते होते हे आता लक्षात नाही; पण एकानंतर एक मुद्दे निघत गेले. दोन्ही न्यायाधीशांनी अनेक न्यायालयीन निवाडे तपासले आणि जवळजवळ अंतिम सुनावणीच होऊन प्रकरण नामंजूर केले.

आपल्या एकाच प्रकरणाने आख्खा दिवस खाल्ला म्हणून मी न्यायाधीशांचे आभार मानताना क्षमाही मागितली तेव्हा त्यांनी 'नाही. प्रकरण खरोखरच विचार करण्यासारखे होते.' असे म्हणून माझ्या मनातील अपराधी भावना पुसून टाकली.

स्वत:चे काम संपले म्हणजे न्यायालयात जेथे महत्त्वाच्या प्रकरणांची सुनावणी चालू असेल तेथे मी जाऊन बसे. मुंबईत मी वकिलीला यावे अशी सूचना न्या. व्यंकटराव देशपांडे आणि न्या. मुरलीधरराव कानडे या दोघांनीही फार पूर्वी ते दोघेही वकिली करीत असताना केली होती. मुंबईस मी आल्यानंतर त्या दोघांनी वकिलीबद्दल काही उपयुक्त सल्लाही दिला होता. वेगवेगळ्या न्यायाधीशांसमोर चालणारे काम पहावे, ज्येष्ठ वकिलांच्या चांगल्या विवेचनपद्धती पहाव्यात असे त्यांचे म्हणणे होते. न्यायाधीशाचे मत प्रारंभी प्रतिकूल असले तरी धीर न सोडता, आवाज अजिबात न वाढवता, नम्रता कायम ठेऊन आपला मुद्दा कसा मांडावा हे काही वकिलांचे कसब खरोखरच अनुकरणीय होते. शेवटी निर्णय देण्याचा अधिकार न्यायाधीशाचाच असतो. त्याच्यावर ओरडण्याचा, संतापण्याचा काहीच उपयोग नसतो. चांगला न्यायाधीश वकिलाच्या अशा दबावामुळे प्रभावित होत नसतो. न्यायालयात प्रकरण वेळेवर दाखल करणे व ते न्यायाधीशासमोर चालवणे याप्रमाणेच प्रकरणातले कार्यालयीन आक्षेप समजून घेणे व ते वेळेवर दूर करणे कसे आवश्यक आहे हेही, विशेषत: कानड्यांनी मला सांगितले. आमचे स्वत:चे काम संपल्यावर मी व सुधाकर इतरत्र काही महत्त्वाची सुनावणी चालू असेल तरी ती ऐकत बसत असू. काही वेळा मात्र खूपच कंटाळा येई. आमचे काम दुपारी १२ पर्यंतच आटोपून जाई. नंतर आम्ही दोघे जवळपासच्या एखाद्या चित्रपटगृहात चित्रपट पाहण्यास जात असू. आम्ही दोघेही पहिल्यावर्षी मुंबईत एकएकटेच राहत असू. कुटुंबिय नसल्यामुळे न करमणे हाही प्रश्न होता. आमच्या अशा महाविद्यालयीन विद्यार्थ्यासारख्या दुपारीच पळून जाऊन चित्रपटाला जाण्याबद्दल आत्मियतेने आमच्या पालकत्वाची अंशकालीन भूमिका बजावणाऱ्या आमच्याकडच्याच एका ज्येष्ठ वकिलांनी आमची चांगली कानउघडणी केली होती. कोणत्याही वेळी नवा पक्षकार येऊ शकतो व आपण कोर्टात नसणे चांगले नाही, असा त्यांचा युक्तिवाद होता. माझे वडील हीच गोष्ट मला सांगताना एक परिचित उदाहरणही देत. 'क्षेत्रावरचा न्हावी व वकील यांनी आपल्या कामाच्या ठिकाणी गैरहजर राहू नये.'

त्या काळात आम्ही पाहिलेला एक हिंदी चित्रपट माझ्या अजून स्मरणात आहे. उत्तर भारतातील आपल्या गावापासून दूर मुंबईत आलेल्या एका टॅक्सी ड्रायव्हरची मनोवस्था त्या चित्रपटात चित्रित केली होती. जवळपास तीच अवस्था तेव्हा आमचीही होती. या 'गमन' चित्रपटातली एक गजलही माझ्या अजून आठवणीत आहे.

*'सीनेमे जलन, आंखोमे ये तुफाँसा क्यूं है?*
*इस शहरमे हर शख्स परेशाँसा क्यूं है?'*

विद्यार्थीदशा संपल्यानंतर कुटुंबियांना सोडून एकटेच राहण्याचा प्रसंग प्रथमच आला होता. शिवाय मुंबई हे बीडसारखे दीर्घकाळ संबंध असलेल्या परिचितांचे गाव नव्हते.

आपल्याला वेगाने उत्तम इंग्रजी बोलण्याचा सराव नाही, घटनात्मक कायद्याचा दैनंदिन अभ्यास नाही अशा शंका सुरुवातीला मनात येत. श्रेष्ठ दर्जाचे विवेचनकौशल्य व कायद्याचा परिपूर्ण अभ्यास असलेले काही आदर्श वकील मुंबईत पहावयास मिळत होते. पण सर्वसाधारण परिस्थिती मात्र दिपून जाण्यासारखी नव्हती. मुंबईतील एक ख्यातनाम फौजदारी वकील माझ्या पूर्वीपासून परिचयाचे होते. बीडला त्यांनी व मी एकमेकांविरुद्ध काही प्रकरणे चालवली होती. त्यांच्याजवळ मी या शंका एकदा सहज बोलून दाखवल्या; तेव्हा वकीलसंघाच्या त्या मोठ्या दालनाच्या कोपऱ्यात ते मला घेऊन गेले व म्हणाले, येथे दिसणाऱ्या बहुतेक वकिलाइतकेच, कांहीपेक्षा तर जास्तच कायद्याचे ज्ञान तुला आहे. तुझी समजही चांगली आहे, अनुभवही आहे. फक्त फरक एवढाच की येथल्या वकिलांचे शर्टस् आणि बँडस् 'लिच अँड कंपनी'त धुतलेले व अधिक कडक आहेत; शिष्टाचारादाखलचे काही न्यायालयीन शब्दप्रयोग त्यांच्या अंगवळणी पडले आहेत. ते सगळे आपोआप तुलाही जमेल. तुझे कार्यालय मात्र उत्तम पाहिजे.

त्यातला टायपिस्ट, पुस्तके, उत्तम फर्निचर, एक-दोन वेगवेगळ्या रंगाचे फोन हा सगळा देखावा नव्या पक्षकाराच्या मनात आदरयुक्त भीती निर्माण करण्यास उपयोगी पडतो.' माझा आत्मविश्वास वाढण्याला त्यांचे हे बोलणे उपयोगी पडले. पण त्यांच्या सूचनेतले झकपक कार्यालय मात्र मुंबईत मला करता आले नाही.

अर्थात मुंबईत माझ्यासाठी शिकण्यासारखे पुष्कळच होते. आपल्याला मांडावयाचे मुद्दे तर अभ्यासावेतच, परंतु प्रतिपक्षातर्फे काय मुद्दा उपस्थित केला जाईल अगर न्यायाधीश कोणते प्रश्न विचारू शकतील याचा अंदाज घेऊन त्याचीही तयारी केली पाहिजे हे माझ्या वडलांनी मला सांगितले होते. मुंबईत अशी पूर्ण तयारी असणारे अनेक वकील मी पहात होतो. वकील जेवढा व्यासंगी तेवढा तो अधिक नम्र असेही पहावयास मिळत होते. न्यायासनाबद्दल वकिलांच्या मनात किती आदर असला पाहिजे व तो त्याने कसा व्यक्त केला पाहिजे याची उदाहरणे अनेकदा समोर घडत होती. एच.एम. सिरवाई हे न्यायक्षेत्रातले एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व. ते एका प्रकरणात बाजू मांडत होते. प्रकरणाची सुनावणी दिवसअखेर अपूर्ण राहिल्यामुळे दुसऱ्या दिवशी तेच प्रकरण प्रथम पुकारले जाणार होते. सिरवाई लिफ्टने त्या मजल्यावर येत असताना मध्येच लिफ्ट अकस्मात दोन तीन मिनिटे थांबली आणि सिरवाईंना थोडा उशीर झाला. न्यायाधीशांनी आसन ग्रहण केले त्या क्षणी सिरवाई न्यायालयात नव्हते. ते त्यानंतर दोनच मिनिटांनी पोहोचले. आल्याबरोबर त्यानी अत्यंत नम्रतापूर्ण शब्दांत न्यायाधीशांची क्षमायाचना केली. आपले प्रकरण असेल तर न्यायाधीश येण्यापूर्वी कोर्टात हजर राहून ते येताच त्यांना उत्थापन दिले पाहिजे हा संकेत पाळण्याचा त्यांचा कटाक्ष होता.

तालुका कोर्टाच्या निर्णयाविरुद्ध फार मोठे दावे वगळता पहिले अपील जिल्हा न्यायालयात व जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध दुसरे अपील उच्च न्यायालयात होते. दुसरे अपील फक्त कायद्याचा विशेष मुद्यावरच दाखल करून घेतले जाते. कायद्याचा कोणता मुद्दा ऐकावयाचा आहे हे अपील दाखल करून घेताना उच्च न्यायालय निश्चित करते. मात्र काही वेळा याबाबत काटेकोर न राहता तारतम्याचा वापरही केला जातो. मी दाखल केलेल्या एका अपीलात ओढून ताणून एक कायद्याचा मुद्दा असल्याचे मी दाखवले तरी त्यात फारसा अर्थ नाही हे मला माहीत होते. त्यामुळे अपील दाखल करून घेतले जाणार नाही असे मला वाटत होते. पण त्यात एक वेगळाच मुद्दा मिळाला. तालुका कोर्टाच्या ज्या न्यायाधीशांनी निकाल दिला होता त्यांच्याबद्दलचे मत आमच्या क्षेत्रात चांगले नव्हते. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दलच शंका होती. आपले हे कर्तृत्व झाकण्यासाठी ते गृहस्थ बराच देवदेवही करीत. मी त्यांच्या निकालपत्रातील शेवटच्या पानावरचा काही मजकूर वाचून दाखवत असताना न्यायमूर्तींचे लक्ष शेवटी टंकलिखित न्यायाधीशाच्या नावाकडे गेले आणि सगळा रंगच बदलला. 'हे गृहस्थ मला माहीत आहेत', एवढेच उघडपणे बोलून पण चेहऱ्यावर 'त्यांचा निकाल सरळ झालेला नसणार' असा मूक अभिप्राय व्यक्त करून त्यांनी अपील दाखल करून घेतले.

मात्र काही वेळा याच्या उलट अनुभवही पक्षकारांच्या नशिबी असतो. दोन निकटच्या परिचित सहव्यवसायी वकिलांपैकी एक न्यायाधीश झाला. गृहस्थ अतिशय प्रामाणिक पण भित्रा होता. आपल्यासमोर एखाद्या जवळच्या वकिलाचे काम चालले व त्याचा निकाल प्रकरणाच्या गुणवत्तेमुळे त्याच्यासारखा द्यावा लागला तरी लोकांना आपण त्या वकिलाना झुकते माप देतो असे वाटेल अशी त्याला शंका येई. म्हणून शक्यतो त्याच्याविरुद्ध निकाल देण्याकडे त्याचा कल असे. एका प्रकरणात वादीला एकतृतीयांश हिस्सा मिळावयास पाहिजे होता; पण खालच्या कोर्टाने कमी दिला होता. हे उघड उघड चूक होते. अपील दाखल करून घेण्यास काहीच अडचण नव्हती. अडचण आली ती निकटतेची. मित्र समोर उभा पाहताच न्यायाधीशांनी अपीलातील मुद्दा नीट समजून न घेताच ते नामंजूर केले. पक्षकारावर विनाकारण अन्याय झाला.

काही वेळा पक्षकाराचे नशीब हाच निर्णायक घटक ठरतो. अंबाजोगाईच्या दोन व्यापाऱ्यांत भरबाजारात भांडण झाले होते. रागाच्या भरात एकाने दुसऱ्याच्या तोंडात मारली. सर्वांसमक्ष झालेला हा

अपमान विसरणे कठीण असल्याने तेथील न्यायालयात खासगी फिर्याद दाखल केली गेली. दंडाधिकाऱ्यांनी ही फिर्याद खारीज केली. खाजगी फिर्याद नामंजूर झाली तर त्याविरुद्ध उच्च न्यायालयातच अपील होते. फिर्यादी आपल्या वकिलांना घेऊन मला भेटला तेव्हा आरोपींच्या निर्दोष मुक्ततेविरुद्धच्या अपीलात उच्च न्यायालयाने सामान्यत: हस्तक्षेप करू नये असा संकेत आहे, फिर्यादी व आरोपी याचे संबंध पूर्वीपासून चांगले नव्हते असे पुराव्यात आले आहे त्यामुळे तुमच्या साक्षीवर विश्वास ठेवलेला नाही वगैरे कारणे सांगून हे प्रकरण दाखल करून घेतले जाण्याची शक्यताच कमी आहे, तेव्हा उगीच खर्च करू नका असे मी सांगितले. पक्षकाराने ते ऐकून घेतले पण 'तुम्ही दाखल करा, माझ्या नशिबाने जे होईल ते पाहू' असे मला सांगितले. हे प्रकरण जेव्हा प्राथमिक सुनावणीस आले तेव्हा ते अर्ध्या मिनिटांत नामंजूर होईल असा माझा कयास होता. कर्तव्यबुद्दीने मी आपली बाजू मांडण्यासाठी तोंड उघडले व 'शहरातल्या भर बाजारात एका व्यापाऱ्याच्या तोंडात मारून त्याचा अपमान करून आरोपीने दहशत निर्माण केली' असे पहिले वाक्य बोलले. आश्चर्य असे की, न्यायाधीशांनी हे प्रतिपादन फार गंभीरपणे घेतले व या प्रकरणात वैद्यकीय पुरावा आहे काय अशी इच्छा केली. एका स्थानिक डॉक्टरची साक्ष झाली होती व त्यांनी 'फिर्यादी मजकडे आला तेव्हा त्याचा गाल लाल झाला होता' एवढेच आपल्या जबाबनीत सांगितले होते. तो भाग मी वाचून दाखवला व लगेच अपील दाखल करून घेतले गेले. या अनपेक्षित न्यायालयीन आदेशाचा आणखी एक अनपेक्षित चांगला परिणाम झाला. तो म्हणजे दोन्ही व्यापारी पक्षकारात नंतर तडजोड झाली आणि त्यांचे दीर्घकालीन शत्रुत्व संपुष्टात आले.

उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी तांत्रिक व पुस्तकी पद्धतीने खटले न चालवता न्यायबुद्धीचा वापर कसा करावा व कायद्याच्या चौकटीत न्याय बसवण्याचा प्रयत्न कसा करावा याची काही उदाहरणे मला पाहता आली. आष्टी तालुक्यातील एका सधन प्रौढ विधवेने आपल्या पैशाची चांगली बचत व्हावी या उद्देशाने आष्टीतल्या एका बँकेत खाते उघडले होते. तिच्या घराशेजारी राहणारा एक पिग्मी एजंट तिचे पैसे दर आठवड्यास नेऊन खात्यात भरत असे. या बाईंनी एकदा आपली एक जमीन विकली. त्याचे आलेले जवळपास पन्नास हजार रुपये बँकेत भरावयाचे होते. त्या शेजाऱ्यावर बाईंचा विश्वास बसलाच होता. पैसे त्याच्या हातात देऊन 'बँकेत माझ्या खात्यात भर' असे बाईंनी सांगितले. एजंटने पैसे घेतले व बाईंच्या खात्यात जमा करण्याऐवजी आपल्याच खात्यात ते जमा केले. बरेच दिवस बाईंना या गोष्टीचा पत्ताच लागला नाही. जेव्हा लागला तेव्हा एजंटाने आपण पैसे घेतल्याचेच नाकबूल केले. पोलिसांकडे तक्रार झाली व न्यायालयात खटलाही झाला. दंडाधिकाऱ्यांनी पैसे घेतल्याची पावती नाही व इतर पुरावा पुरेसा नाही असे ठरवून आरोपीला सोडून दिले. त्याविरुद्धचे अपील बाईंनी मुंबईत दाखल केले. न्या. देसाई यांच्यासमोर हे प्रकरण आले असता त्यांनी हे अपील दाखल का करून घेऊ नये अशी विचारणा करणारी नोटीस आरोपीला काढली. आरोपी माझ्याकडे आला व मी वकीलपत्र दाखल केले. उच्च न्यायालयाने सामान्यत: अशा प्रकरणात हस्तक्षेप करू नये असे सांगणारे अनेक निकाल मला माहीत असल्यामुळे आपल्याला यश मिळेल असे मला वाटत होते.

पहिल्याच तारखेवर मी हजर झालो. न्या. देसाईंनी मला सांगितले की पक्षकाराला पुढच्या तारखेला हजर ठेवा. मी त्याप्रमाणे पक्षकाराला सूचना दिली. पक्षकार आणि फिर्यादी बाई दोघेही समक्ष हजर राहिले. न्या. देसाईंनी माझ्या पक्षकाराला घाम फुटेल अशा भाषेत त्याला सांगितले की 'तू पैसे घेतले आहेस, असे दिसते. खरे काय ते तू कबूल कर नाही तर मग तुला जेलमध्ये पाठवण्याचा विचार करावा लागेल.' आरोपी पक्षकाराने ताबडतोब बाईंच्याकडून पैसे घेतल्याचे कबूल केले. पैसे सध्या कुठे आहेत असे विचारले असताना त्यापैकी चाळीस हजार अजून बँकेत आहेत. आठ-दहा हजार खर्च झाले असा सरळ कबुलीजबाब त्याने दिला. ज्या दिवशी बाईंनी विकलेल्या जमिनीचे खरेदीखत झाले त्यानंतर आठच दिवसांनी विक्रीच्या रकमेइतकीच रक्कम आरोपीच्या खात्यात जमा झाली होती, ही गोष्ट पुराव्यात आली होती. खालच्या कोर्टाने महत्त्व न दिलेली ही गोष्ट न्या. देसाईंच्या ताबडतोब लक्षात आली होती. 'बँकेत शिल्लक असलेली चाळीस हजारांची रक्कम बाईंच्या खात्यात आठ दिवसांत भरून टाक मी

प्रकरण पंधरा दिवसांनी ठेवतो;' असे त्यांनी सांगितले. न्यायाधीशांचे मत आपल्याबाजूने आहे हे कळाल्याबरोबर फिर्यादीच्या वकीलांना एकदम जोर आला व त्यांनी चाळीस कसे, पूर्ण पन्नास परत मिळाले पाहिजेत, असे म्हणावयास सुरुवात केली. त्यांचा हा आग्रह पाहून न्या. देसाई भडकले. 'ठीक आहे. हे अपील तर नामंजूर होणारच. नंतर तुम्ही आष्टीच्या कोर्टात दिवाणी दावा लावा त्याची दोन अपीले होतील तोपर्यंत ही बाई मरून जाईल. दोन्ही बाजूच्या वकिलांना उरलेले पैसे मिळतील' असे ते वैतागाने म्हणाले. शेवटी चाळीस हजार परत मिळवणेच शहाणपणाचे आहे हे त्या वकिलांच्याही लक्षात आले. माझा पक्षकार पैसे बाईंच्या खात्यात भरून आल्यावर आठ दिवसांनी पुढील सुनावणी झाली आणि खालच्या कोर्टाच्या निकालात हस्तक्षेप करण्यासारखे पुरेसे कारण नाही असे छोट्या निकालपत्रात लिहून फिर्यादीचे अपील नामंजूर करण्यात आले. निकालपत्रात काहीही म्हटले असले तरी प्रत्यक्षात मात्र न्याय झालेला होता. कधी कधी अशा प्रकारे आपल्या अधिकाराचा आणि वजनाचा योग्य तो वापर न्यायाधीशांनी केला तर न्याय मिळण्यास मदत होते. मात्र ही काळजीपूर्वक व क्वचितच करण्याची गोष्ट आहे. सर्व वकिलांचे त्यासाठी पूर्ण सहकार्य लागते.

न्यायाच्या प्रक्रियेत कनिष्ठ न्यायाधीशांकडून झालेली डोळेझाक कित्येकवेळा अन्यायाचे कारण ठरते. राम रत्नाकर या अहमदनगरच्या माझ्या स्नेही वकिलांनी माझ्याकडे पाठवलेले एक प्रकरण यादृष्टीने उल्लेखनीय आहे. शिर्डीला दर्शनासाठी येणाऱ्या मुंबईच्या एका व्यापाऱ्याने मोटासायकलवरून जाणाऱ्या तिघांना गावाजवळच धडक दिली. त्यात एकाचा मृत्यू झाला, दुसऱ्याचा पाय तुटला आणि तिसऱ्याचे मुक्या मारावर निभावले. या खटल्यात खालच्या कोर्टात आरोपीची निर्दोष सुटका झाली होती. त्याविरुद्धचे अपील मी दाखल केले. खालच्या न्यायालयाची संचिका मुंबईत आल्यावर मी ती पाहिली तेव्हा धक्कादायक गोष्टी उघडकीला आल्या. आरोपी शेजारी बसलेल्या बाईच्या गळ्यात हात घालून गाडी चालवत होता, असेही पोलिस तपासात आले होते. साक्षीदारांच्या यादीत पाय तुटलेला आणि दुसरा या दोघांचीही नावे होती. तसेच प्रत्यक्ष पाहणारा एक साक्षीदारही होता. या तिघांनाही साक्षीत बोलावण्यात आले नव्हते. न्यायाधीशांनी माझ्यासमोर महत्त्वाचा पुरावाच आला नाही असे निकालपत्रात म्हटले होते. कोणत्या साक्षीदारांना बोलवावे याची यादी सरकारी वकिलांनी द्यावयाची असते. बहुतेक वेळा अशी वेगळी यादी देण्याऐवजी आरोपपत्रातील साक्षीदारांच्या नावावरच खुणा करून तेवढ्याच लोकांना समन्स काढा असे तोंडी सांगितले जाते. सरकारी वकिलांनी फक्त कपडे जप्त करणारा पंच आणि खटला दाखल करणारा पोलिस अधिकारी या दोघांच्याच नावावर खुणा केल्या होत्या. बाकी कोणाला बोलावण्यात आलेच नव्हते तर ते येणार कसे? कनिष्ठ कोर्टातही मी काम केले होते. त्यामुळे हे काय घडले आहे हे मला ताबडतोब कळाले. जेव्हा हे प्रकरण उच्च न्यायालयात निघाले तेव्हा ही गोष्ट मी न्यायाधीशांच्या नजरेस आणली. जर एखादा महत्त्वाचा साक्षीदार कोणत्याही कारणाने फिर्यादी पक्षाने बोलावला नाही तर न्यायाच्या हितासाठी तो बोलावण्याचा अधिकार न्यायालयालासुद्धा आहे. या अधिकाराचा वापर न्यायाधीशांनी करावयास हवा होता असे माझे म्हणणे होते. त्या पुष्ठ्यर्थ मी वॉरन हेस्टिंग्जच्या खटल्यातील विल्यम पिटच्या भाषणातील एक उतारा उद्धृत केला होता. न्यायाधीशाचे आसन इतरांपेक्षा उच्च असते. ते त्याचा चेहरा इतरांना नीट दिसावा म्हणून नव्हे तर इतरांपेक्षा उच्च पातळीवरून त्याने विचार करावा म्हणून ते असते. असे पिटने म्हटले होते. न्यायाधीशांनी निकालपत्रात तो उद्धृत करून माझा पुनर्विलोकन अर्ज मंजूर केला आणि हे प्रकरण फेरचौकशीला खाली परत पाठवले.

मी मुंबईत येऊन दीड वर्ष झाले होते. शाळा सुरू होण्याच्या सुमाराला मुलांना घेऊन नंदिनीनी यावे असे ठरले होते. जून सुरू झाला आणि नंदिनी अगोदर भक्ती व श्रीधरला घेऊन माझ्याबरोबर मुंबईत आली. मुंबई तिने कधीच पाहिली नव्हती. लोकलची गर्दीही अनुभवली नव्हती. ठाण्याला बसने पोहोचल्यानंतर आम्ही लोकलमध्ये बसून मुलुंडला यावयास निघालो. मुलुंड दुसरेच स्टेशन. मी एका हातात भक्ती व दुसऱ्या हातात सुटकेस घेऊन खाली उतरलो. नंदिनी मात्र उतरू शकली नाही. तिच्या

एका हातात श्रीधर होता व दुसऱ्या हातात एक सामानाने भरलेली पिशवी. ही पिशवी असलेला हात डब्याच्या दारात असलेल्या खांबाच्या दुसऱ्या बाजूला राहिला आणि ती उतरेपर्यंत गाडी सुरू झाली. पुढच्या भांडुप स्थानकावर तिला उतरता आले आणि मी नंतरच्या लोकलने भांडुपला जाऊन तिला परत आणले. मुंबईतील गर्दी, धावपळ आणि त्या सर्वांतून निर्माण होणारी थोडीशी असुरक्षितता या साऱ्याचा अनुभव नंदिनीला आल्या आल्याच आला. घर लावल्याबरोबर घरी स्वयंपाक सुरू झाला. सकाळी न्यायालयात जाण्यापूर्वीच जेवण्याची बीडला प्रथा होती. त्याप्रमाणे येथे नऊपूर्वीच जेवण तयार होऊ लागले. चारीठाव भरपूर जेवल्यानंतर लोकलचा उभ्याने प्रवास करणे कठीण आहे हे पहिल्याच दिवशी लक्षात आले. तेव्हा न जेवता डबा नेऊ लागलो. काही वेळा फायलींना लोणच्याचा वास लागू लागला. सायली आणि मेघना याही नंतर मुंबईत आल्या आणि शाळेत दाखल झाल्या.

जी प्रकरणे खालच्या कोर्टात मी चालवली होती त्याची अपीलेही काही वेळा मला चालवावयाला मिळाली. बीड जिल्हा परिषदेच्या सदस्यपदाच्या निवडणुकीत मतदारांना वाहनातून नेले या आरोपामुळे माझे एक पक्षकार माधवराव पौळ यांची निवडणूक जिल्हा न्यायालयात रद्द झाली होती. त्याविरुद्धचे अपील मी मुंबईत येण्यापूर्वीच दाखल झाले होते. ते चालवण्यासाठी परत माझ्याकडे आले. जिल्हा परिषद कायद्यातील २७ व्या कलमानुसार निवडणुकीला आव्हान देणारे अर्ज जिल्हा न्यायालयातील ते चालवण्याचा अधिकार दिलेल्या न्यायाधीशासमोर चालत असत. महाराष्ट्रातील सर्व सहाय्यक जिल्हा न्यायाधीशांना असा अधिकार देणारी अधिसूचना सरकारने काढली होती. हे प्रकरण त्याप्रमाणे सहायक जिल्हा न्यायाधीशाकडे वर्ग करावयास हवे होते. त्याऐवजी जिल्हा न्यायाधीश टी.आर. कुलकर्णी यांनी ते स्वत:च चालवले. निवडणुकीबद्दलचा वाद चालवण्यासाठी विशिष्ट अधिकारपदावरील व्यक्ती अधिकृत केली जाते; न्यायालयाला अधिकार नसतो. जिल्हा न्यायाधीश हे त्या न्यायालयाचे मुख्य असले तरी त्यांना स्वतंत्रपणे या कामासाठी अधिकृत केलेले नाही; म्हणून हा निकाल अधिकारक्षेत्र नसताना दिलेला आहे आणि तो रद्द करावा असा माझा मुद्दा होता. हा मुद्दा मान्य करून उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायाधीशांचा निकाल रद्द ठरविला.

एखाद्या वकिलाने कायद्याचा अर्थ काटेकोरपणे लावून काही तांत्रिक मुद्दा उपस्थित केला तर त्याचेही कधी स्वागत होई. हिंदू विवाह कायद्यात प्रकरण चालू असताना तात्पुरती पोटगी देण्याची तरतूद आहे. एका प्रकरणात खालच्या न्यायालयाने ५० रुपये दरमहा अशी तात्पुरती पोटगी देण्याचा हुकूम केला होता. अशा हुकूमामध्ये सामान्यत: उच्च न्यायालय हस्तक्षेप करीत नाही. ज्या हुकूमाविरुद्ध मला अपील करावे लागले तो हुकूम कनिष्ठ न्यायाधीशांनी केवळ दोन ओळीत संपवला होता. न्या. देसाई यांच्यासमोर हे प्रकरण निघाले असताना त्यांनी 'कशाला अपील केले' अशी योग्य विचारणा केली. प्रश्न बरोबर होता; पण त्याचे उत्तर देताना मी एक कायद्याचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. पक्षकारांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती, खटल्यातील त्यांची वर्तणूक अशा गोष्टींचा विचार करून पोटगीची रक्कम न्यायालय ठरवील असे कायद्यात म्हटले होते. या आवश्यक गोष्टींचा विचार केला तरच पोटगी ठरवण्याचा अधिकार न्यायालयाला प्राप्त होतो; येथे तो झालेलाच नाही, असा माझा मुद्दा होता. देसाईंच्या मनात काय आले माहीत नाही, ते हसले आणि त्यांनी प्रकरण दाखल करून घेतले.

मुंबई शहरात कनिष्ठ न्यायालयात काम करणारे बॅ. बाफना हे माझे पूर्वपरिचित होते. बीड ही त्यांची सासुरवाडी होती. मोकळा वेळ असला म्हणजे हायकोर्टासमोरच्याच गल्लीत असलेल्या त्यांच्या कार्यालयात कधी कधी मी जाऊन बसत असे. बाफना उच्च न्यायालयात फारच थोडी प्रकरणे चालवीत. ते इतरत्र गुंतले असताना एक-दोन वेळा त्यांच्या प्रकरणात उच्च न्यायालयात मी हजर राहिलो. त्यातील एक प्रकरण फोर्टमधल्या पादपथावर व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांचे होते. त्यामुळे या मंडळींची माझी थोडी ओळख झाली होती. मला टेपरेकॉर्डर विकत घ्यावयाची इच्छा होती. बाफनांच्या या पक्षकारापैकी एक-दोन लोक परदेशी बनावटीचे टेपरेकॉर्डर्स आणि तत्सम वस्तू विकत. त्यावेळी मुंबईत अशा वस्तू सर्वत्र मिळत नसत. मी अशा एका दुकानदाराकडे गेलो. दुकान म्हणजे काय तर फुटपाथवर एका घडीच्या

टेबलावर मांडलेली खोकी. मी मला काय हवे आहे  हे सांगितल्यानंतर वस्तू पाहण्यासाठी एक खोके घेऊन ते उघडू लागलो तर ते रिकामे आढळले. ही सर्व खोकी रिकामी आहेत, माल दुसरीकडे ठेवला आहे, असे त्याने मला सांगितले. पोलिसांनी फुटपाथवरचे दुकान उचलून नेले तर नुकसान होऊ नये म्हणून तेथे फक्त खोकीच होती. त्याने नंतर एका गल्लीतील गोदामात मला नेले व तेथे वेगवेगळ्या प्रकारचे टेपरेकॉर्डर्स मला दाखवले. विविध कायद्यातून आणि नियमातून पळवाटा काढण्यासाठी मुंबई शहरात चालणाऱ्या दुहेरी जीवनाचा हा एक अगदीच छोटा नमुना होता.

उच्च न्यायालयातले एक प्रकरण बहुधा बाफनांच्या ओळखीनेच माझ्याकडे आले. पक्षकार भाडेकरू होते व घरमालकाने जागा परत घेण्यासाठी कारवाई केली होती. खोलीचे भाडे दरमहा दोन रुपये होते. एवढेच भाडे देणाऱ्या गरीब पक्षकाराकडून काय फी घेणार? म्हणून मी तुम्हाला वाटेल ती फी द्या असे पक्षकाराला म्हणालो. पक्षकाराने जी रक्कम माझ्या हातात ठेवली ती मराठवाड्यातल्या कोणत्याही भाडेकरूने दिली असती त्यापेक्षा अधिक होती. मग लक्षात आले की मुंबईतील भाडेकरूची जागा हा त्याच्यासाठी जीवन-मरणाचा प्रश्न आहे.

मुलुंडची जागा मला साधारण पाच वर्षे लागेल असे मी खरवडकरांना सांगितले होते. अचानक एके दिवशी प्रकाश खरवडकर पंजाबमधील त्यांचा कारखाना सोडून मुंबईत परत आले. त्यांच्या भागीदाराने कारखाना बंद करावयास लावला होता. मालक परत आल्यामुळे त्यांना जागा रिकामी करून देणे हे मला आवश्यक वाटत होते. त्यावेळी माझ्या मुलीची-सायलीची परीक्षा चालू होती. ती चार-पाच दिवसांत आटोपल्यावर मी जागा रिकामी करून देतो असे मी प्रकाशला सांगितले. तोपर्यंत मित्राकडे ते राहिले. मुलींच्या परीक्षा आटोपताच नंदिनी आणि मुलांना बीडला पाठवून दिले आणि मी माझे सामान हलवण्याची तयारी केली.  या आमच्या इमारतीत राहणाऱ्या सर्वांनाच मी जागा सोडतो आहे हे कळाले होते. खालच्या मजल्यावर राहणाऱ्या शिकारखाने मावशी माझ्याकडे आल्या व मुलुंडमधल्याच 'नवसाईसदन' इमारतीत त्यांच्या मुलाचा एक फ्लॅट आहे व तो रिकामा आहे; त्याची किल्ली मी तुला देते. तेथे तू राहा' असे त्यांनी सांगितले. शिकारखाने बीडला खूप वर्षांपूर्वी पोस्टमास्तर होते. अचानक जागेची सोय झाली आणि चिंता मिटली. ही इमारत जवळच होती. तेथे मी सामान हलवले. जागा लहान असली तरी मला एकट्याला राहावयाला आणि तळमजल्यावर असल्यामुळे वकिलीच्या कार्यालयाला सोयीची होती. मी कोणतीही खळखळ न करता ताबडतोब जागा सोडतो याचा चांगला परिणाम होता. मुलुंडमध्येच आणखी एक जागा मला देण्याची तयारी एकाने दाखवली होती; पण त्याची गरज पडली नाही. नवसाईसदनमध्ये मी राहत असताना एकदा आंघोळीनंतर पाय घसरून पडलो व माझ्या हाताला फॅक्चर झाले. आठ-दहा दिवस मला हात गळ्यात अडकवून न्यायालयात जावे लागे. मी घरी हे कळवले नव्हते. पण बीडहून आलेल्या कोण्यातरी दुसऱ्या वकिलाच्या पक्षकाराने ही गोष्ट काकांना- माझ्या वडलांना सांगितली. लगेच त्यांचा निरोप आला आणि मला सविस्तर माहिती कळवावी लागली. काळजीचा एक विषय त्यांना कळू न देण्याचा माझा प्रयत्न अयशस्वी झाला.

महाराष्ट्र नगरपालिका कायद्यान्वये निवडून आलेल्या नगरसेवकांची मुदत पाच वर्षांची असते. ही मुदत योग्य कारणासाठी आणखी एक वर्ष वाढवण्याचा अधिकार राज्य सरकारला कायद्याने दिला आहे. १९८० साली असे झाले की, महाराष्ट्रातील सुमारे १९२ नगर परिषदा मूळ मुदत पाच वर्षे व वाढवलेले एक वर्ष असे सहा वर्षे पूर्ण होऊनही तशाच अस्तित्वात राहिल्या. नव्या निवडणुका तोपर्यंत झाल्याच नाहीत.  निवडून आलेल्या सदस्यांचे अस्तित्व सहा वर्षांनंतर राहू शकत नाही असे माझ्या पक्षकाराचे म्हणणे होते. त्या रिटअर्जामुळे महाराष्ट्रातील अशा सर्व नगरपालिका राज्यसरकारने बरखास्त केल्या आणि कायद्यात काही दुरुस्त्या केल्या. मूळ मागणी मान्य झाल्यामुळे माझा रिटअर्ज पुढे चालवण्याचे काम पडले नाही तरी तो अनेक दिवस चर्चेचा विषय झाला होता.

जुन्या हिंदू कायद्यानुसार दत्तकाच्याबाबतीत असलेल्या काही तरतुदी आज अस्तित्वात नाहीत. पत्नीने घेतलेला दत्तक हा पतीच्या मृत्यूच्या तारखेलाच त्या घराचा सभासद झाला व मुलाचे सर्व

अधिकार त्याला प्राप्त झाले असे जुन्या कायद्यानुसार समजले जाई. ही तरतूद योग्य होती. परंतु त्याबरोबरच असेही ठरवण्यात आले होते की दत्तविधान झाल्याबरोबर ज्याच्यासाठी दत्तक घेतले त्याची सर्व संपत्ती दत्तक मुलाच्या मालकीची होईल. स्त्रियांना स्थावर मालमत्तेत तेव्हा वेगळा हिस्सा मिळत नव्हता. एका म्हातारीने नवा कायदा येण्यापूर्वी एका मुलाला दत्तक घेतले. दत्तक मुलगा सैन्यामध्ये आठ-दहा वर्षे काम करत होता. तेथून निवृत्त झाल्यानंतर गावी आल्यावर त्याने पुण्यकर्म असे केले की आपल्या म्हाताऱ्या दत्तक आईला तिच्या घरातून बाहेर हाकलून दिले. तिला शेतीच्या उत्पन्नात हिस्सा किंवा पोटगी देण्याचा तर प्रश्नच नव्हता. मेल्यानंतर स्वर्ग मिळावा म्हणून विधि करण्यासाठी मुलगा हवा म्हणून दत्तक घेतला तर त्याने घेणाराचे असे पांग फेडले होते. म्हातारीने आपल्याला घरात राहू द्यावे व दत्तक मुलाने जमिनी विकू नयेत म्हणून कनिष्ठ न्यायालयात मनाई हुकूमाचा दावा दिला. त्यात खालील कोर्टाने मनाई हुकूम दिला नाही. जिल्हा न्यायालयानेही त्यात हस्तक्षेप केला नाही. म्हणून रिव्हीजन अर्ज करून मी उच्च न्यायालयात दाद मागितली. कायद्याप्रमाणे दत्तक मुलगा पूर्ण मालक झाला असला तरी दत्तक आई ही त्या कुटुंबाची एक सभासद आहे. त्या वाड्यात तिला राहण्याचा पूर्ण अधिकार आहे व तिचा सांभाळ करण्याची जबाबदारी दत्तक मुलाची आहे. याची व्यवस्था होईपर्यंत दत्तकाला मिळालेली कोणतीही स्थावर मालमत्ता विकण्याला त्याला प्रतिबंध करावा अशी म्हाताऱ्या आईतर्फे मी केलेली मागणी उच्च न्यायालयाने मान्य केली. कुटुंबातील संपत्ती कायद्याने कोणाच्याही मालकीची असो, कुटुंबातील प्रत्येक सदस्याला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे व त्यासाठी या संपत्तीचा उपयोग केला पाहिजे हे न्यायालयाने मान्य केले होते.

नोव्हेंबर १९८० मध्ये न्या. व्यंकटराव देशपांडे मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती झाले. हा मराठवाड्यातील आम्हा सर्वांसाठी एक आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण होता. हैदराबाद राज्यातील वकील आणि न्यायाधीश या दोघांच्याही कार्यक्षमतेबद्दल काहीशी पूर्वदूषित भावना काहींच्या मनात होती. प्रदेशाचे मागासलेपणा आणि संस्थानी राजवट यामुळे जणू बुद्धिमान, अभ्यासू आणि प्रामाणिक व्यक्ती तिकडे निर्माणच होऊ शकत नाहीत असे गृहित धरणारीही थोडी मंडळी होती. देशपांडे जरी ज्येष्ठतेनुसारच मुख्य न्यायाधीश झाले असले तरी त्यांचा सन्मान हा जणू काही आपलाच सन्मान आहे अशी मराठवाड्यात भावना होती. न्या. देशपांडे यांच्या मुख्य न्यायाधीश म्हणून झालेल्या नियुक्तीचे स्वागत करण्यासाठी अनेक सदिच्छा भोजने झाली. मराठवाड्यातील वकिलाबरोबरच इतर काही ज्येष्ठ वकिलांनीही त्यांचा असा सन्मान केला.

योगायोग असा की व्यंकटरावजी मुख्य न्यायाधीश झाले त्यावेळी अब्दुल रहेमान अंतुले हे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी होते. या योगायोगामुळे मराठवाड्याची बऱ्याच दिवसापासूनची एक मागणी पूर्ण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. राज्यपुनर्रचनेच्यावेळी मराठवाड्याचे बरेच काम हैदराबाद उच्च न्यायालयात होते आणि ते उर्दूत होते. ही सगळी प्रकरणे चालवण्यासाठी आणि मराठवाड्यातील लोकांना मुंबई लांब पडत असल्याने तसेच या भागातील कायदे निराळे असल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाचे एक न्यायपीठ औरंगाबाद येथे स्थापन करावे अशी मागणी होती. त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या यशवंतराव चव्हाणांना ही मान्य असली तरी तत्कालीन मुख्य न्यायाधीशांना ते मंजूर नव्हते. उच्च न्यायालयाचे न्यायपीठ स्थापन करण्याचा निर्णय राज्यपाल (म्हणजेच मुख्यमंत्री) आणि मुख्य न्यायाधीश या दोघांना मिळून करता येत होता. दोघेही या मागणीला अनुकूल आहेत असा योग प्रथमच आला होता.

मुख्य न्यायाधीशपदी नेमणूक होताच न्या. देशपांडे यांनी या दिशेने हालचाली सुरू केल्या. मुख्यमंत्र्यांनी त्यांना संपूर्ण सहकार्याचे आणि न्यायपीठासाठी आवश्यक त्या सोयी तातडीने करून देण्याचे आश्वासन दिले. अर्थात न्यायपीठाचा मार्ग सुकर नव्हता. उच्च न्यायालयाचे वेगळे न्यायपीठ दुसऱ्या ठिकाणी स्थापन झाल्याने काही अडचणी निर्माण होऊ शकतात, एखाद्या मुद्याचा क्वचित वेगवेगळ्या पद्धतीने ही न्यायपीठे विचार करू शकतात असे काहींना प्रामाणिकपणे वाटत होते. एकाच

ठिकाणी वकील वर्ग असेल तर त्याला आपल्या परंपरा व गुणवत्ता जपणे अधिक सोपे असते असेही त्यांना वाटत होते. काहींच्या मनात मात्र मराठवाड्याच्या गुणवत्तेबद्दलच अहंतापूर्ण शंका होती. गुणवत्ता हे प्रादेशिक मूल्य आहे असे त्यांना वाटत असावे. मुंबई उच्च न्यायालयातील अनेक वकील आणि काही न्यायाधीश औरंगाबादेत न्यायपीठ स्थापनेच्या विरोधात होते. मराठवाड्यातील दोन-तीन वकिलांकडे मराठवाड्यापेक्षा इतर भागातले काम अधिक होते. त्यांनाही असे न्यायपीठ होऊ नये असे मनातून वाटत असावे; पण ते विरोध करत नव्हते.

राज्य पुनर्रचना कायद्याच्या कलम ५१ मध्ये उच्च न्यायालयाचे जादा न्यायपीठ इतरत्र स्थापन करता येण्याची तरतूद होती. मुख्य न्यायाधीशाने हा अधिकार राज्यपालांच्या संमतीने (म्हणजे मुख्यमंत्र्यांनी त्यांना दिलेल्या सल्ल्यानुसार) वापरावयाचा होता. अशी न्यायपीठे नागपूर व राजकोट येथे पूर्वीच स्थापन झाली होती. तसेच मध्यप्रदेश राज्यात ग्वाल्हेर आणि इंदूर येथील न्यायालयांचे मध्यप्रदेश उच्च न्यायालयांच्या न्यायपीठात रूपांतर झाले होते. राज्य पुनर्रचना कायद्याच्या कलम ५१ (२) प्रमाणे असे न्यायपीठ स्थापन करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना होता आणि ५१ (३) प्रमाणे तात्पुरते न्यायपीठ स्थापन करण्याचा अधिकार मुख्य न्यायाधीशांना होता. राज्यपुनर्रचना होऊन २४ वर्षे होऊन गेली होती व एवढ्या दीर्घकाळानंतर मुख्य न्यायाधीशांना हा अधिकार वापरता येणार नाही, ही त्वरित उपाययोजनेसाठीची तात्कालिक तरतूद आहे, एवढा काळ लोटल्यावर तिचा वापर करता येणार नाही असा आक्षेप घेऊन एक रिटयाचिका मुंबई उच्च न्यायालयातच नंतर दाखल करण्यात आली.

न्या. देशपांडे या काळात प्रचंड मानसिक तणावाखाली होते. मराठवाड्याच्या जनतेची एक न्याय मागणी पूर्ण होण्याला अनुकूल संधी आणि अधिकार प्रथमच उपलब्ध झाले होते. आपण यावेळी जर हा निर्णय घेतला नाही तर मराठवाड्याला कधीच न्यायपीठ मिळणार नाही, हे त्यांना माहीत होते. दुसरीकडे उच्च न्यायालयातील बहुसंख्य सहकारी विरोधात आणि मुंबई शहरातील नामवंत वकिलांपैकीही अनेक विरोधात होते आणि मुख्य न्यायाधीशांच्या स्वेच्छाधिकाराविषयी त्यांचा अधिक्षेप करणारी भावना काहींच्या मनात होती. काही वृत्तपत्रात न्या. देशपांडे आणि त्यांनी घेतलेले व्यवस्थापकीय निर्णय यांच्याविरोधात एक आघाडीच उघडण्यात आली. तुमचे निर्णय उच्च न्यायालयाला हानी पोहोचवणारे ठरतील असे न्या. देशपांड्यांना अनाहुतपणे अनेकजण बजावत होते.

मी मुंबईत आल्यानंतर माझे काम कसे चालले आहे, कोणकोणत्या न्यायाधीशांसमोर काम करण्याची संधी मला मिळाली याची न्या. देशपांडे अधूनमधून मला बोलावून चौकशी करीत असत. उच्च न्यायालयाचे एक न्यायपीठ औरंगाबादला स्थापन करण्याचा विचार त्यांच्या मनात आल्यावर त्यांनी मराठवाड्यातील आणि काही बाहेरच्या अनेक वकिलांना त्यांच्या कक्षात वेळोवेळी बोलावून त्यांच्याबरोबर चर्चा सुरू केल्या व सर्वांची मते जाणून घेतली. मलाही एक-दोन वेळा त्यांनी बोलावून न्यायपीठ स्थापनेच्या निर्णय प्रक्रियेतील अडचणींची कल्पना दिली होती. साधारणत: जुलै १९८१ चा सुमार असेल; मुख्य न्यायाधीशांनी मला बोलावून विचारले की 'उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून तुम्ही काम करावे अशी माझी इच्छा आहे. तुमची तयारी आहे काय?' माझ्यासाठी हा फार मोठा सन्मान होता. माझे वडील आणि गोपाळराव एकबोटे हे दोघे एकाचवेळी वकिली व्यवसायात आले होते. हे दोन्ही मित्र वेगवेगळ्या हैदराबादेतील प्रसिद्ध वकिलांकडे कारकून म्हणूनही काही दिवस काम करत होते. वडलांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वत:ला पूर्ण झोकून दिले आणि तुरुंगाच्या बाहेर ते असत तेवढा वेळच वकिली करता येई. एकबोट्यांनी वकिलीवरच लक्ष केंद्रित करून आपले पुढचे शिक्षण पूर्ण केले. कायद्याची पदवी मिळवून वकिलीत चांगला जम बसवला. पुढील काळात ते हैदराबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीशही झाले. वडलांनी मात्र अशा व्यावसायिक यशाच्या मार्गाकडे पाठ फिरवून त्यांना योग्य वाटलेले कर्तव्य केले होते. त्यांना न मिळालेली संधी मला मिळत होती.

नकार देण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु सगळ्या अडचणी मनात उभ्या राहिल्या. त्यावेळी न्यायाधीशांचा पगार आजच्यासारखा नव्हता. न्यायाधीशांना शासकीय वाहनेसुद्धा दिली जात नव्हती. माझ्याजवळ तर

मोटारही नव्हती. लगेच नेमणूक झाली तर आर्थिक अडचणींनाही तोंड द्यावे लागण्याचा संभव होता. 'न्यायाधीशपदासाठी मी तुमचे नाव पाठवतो आहे हे कोणालाही-अगदी बायकोलाही सांगू नका' असे मुख्य न्यायाधीशांनी बजावून सांगितले. हितशत्रूंना कारवाया करण्याची कमीतकमी संधी मिळावी हा त्यांच्या सांगण्यामागचा उद्देश होता. एखाद्याचे नाव न्यायाधीशपदासाठी विचारात आहे म्हटल्याबरोबर त्याच्याविरुद्ध निनावी अर्जांची भेंडोळी पाठवणारे काही असतात. दुसरे म्हणजे हा वकील न्यायाधीश होणार आहे हे कळाले की त्याच्याकडे वकील म्हणून येणारे काम बंद होते आणि प्राप्तीही. न्यायाधीशपद मिळायला मात्र कधी कधी फार उशीरही लागू शकतो. १ ऑगस्ट १९८० रोजी औरंगाबाद येथे एक वकील परिषद झाली. या परिषदेसाठी मुख्य न्यायाधीश आले असताना त्यांनी मी 'तुमचे आणि इतर काहींची नावे सरकारकडे पाठवून दिली आहेत', असे त्यांनी मला सांगितले.

औरंगाबादला उच्च न्यायालयाचे न्यायपीठ स्थापन झाले तर मला औरंगाबादला जावे लागणार हे निश्चित होते. कारण माझ्याकडे मराठवाडा सोडून फक्त नगर जिल्ह्यातील दहा- बारा प्रकरणे होती. न्यायपीठ १५ ऑगस्ट १९८१ पासून स्थापन करण्याचा मुख्य न्यायाधीशांचा मानस होता. औरंगाबादला योग्य ती इमारत शोधावयाची होती. आवश्यक तर वाढ किंवा दुरुस्त्याही करावयाच्या होत्या. मुंबईचा उच्च न्यायालयातील कर्मचारीवर्ग औरंगाबादला येण्यास कितपत तयार होईल ही शंकाही होती. तसेच आणखी जादा कर्मचारीवर्गही लागणार होता. मराठवाड्यातील जिल्हा न्यायालयातून काही कर्मचारीवर्ग निवडून घ्यावा लागणार होता. अशी सर्व तयारी चालू असताना हे न्यायपीठ स्थापन होऊ नये असे वाटणाऱ्या मंडळींनी एक रिट अर्ज मुंबई उच्च न्यायालयात दाखल केला. न्या. प्रताप यांनी उद्घाटनाचा समारंभ करा; पण न्यायपीठाचे कामकाज मात्र सुरू करू नका असा तात्पुरता आदेश दिला. त्याविरुद्धच्या अपीलात दोन्ही वकिलांच्या संमतीने अंतिम सुनावणीची प्रकरणे फक्त औरंगाबादला चालवता येतील असा अंतरिम आदेश न्या. पी.बी.सावंत आणि न्या. सुजाता मनोहर यांच्या खंडपीठाने दिला. न्यायपीठ स्थापनेचा निर्णय न्यायालयीन प्रक्रियेच्या भोवऱ्यात सापडला होता. न्यायपीठ नक्की कधी स्थापन होणार हे कळत नव्हते.

अडीच वर्षांतल्या मुंबईतील वास्तव्याचा नाही म्हटले तर थोडा कंटाळा आला होता. धावपळीतच रोजचा बराच वेळ जात होता. औरंगाबादला अधिक निवांत आयुष्य मिळेल, प्रवासाचा वेळ वाचून अभ्यासाला अधिक वेळ मिळेल असे वाटत होते. न्यायपीठ ऑगस्टमध्ये स्थापन होणार हे कळाल्यानंतर मी आवराआवरीला प्रारंभ केला. औरंगाबादला भाड्याची जागा घेतलीच होती. एके दिवशी न्यायालयाची वेळ संपल्यावर मुख्य न्यायाधीशांचा निरोप आला म्हणून भेटण्यासाठी गेलो तर त्यांनी सांगितले की, 'सध्या तरी औरंगाबादला न्यायपीठ स्थापन करू नये असा निर्णय मी घेतला आहे.' मुख्य न्यायाधीशांचे हे शब्द ऐकून मी हादरूनच गेलो. त्याच दिवशी सकाळी मी घरातले सगळे सामान एक वाहतूक कंपनीमार्फत औरंगाबादला पाठवून दिले होते. आता २-४ दिवस मित्राकडे राहावयाचे व न्यायपीठ स्थापनेच्या दिवशी आपण जावयाचे असे मी ठरवले होते. काही क्षण मी स्तब्ध होतो. त्यानंतर न्या. देशपांड्यांना मी सांगितले की 'आजच मी माझे सर्व सामान औरंगाबादेस पाठवून दिले आहे. मुंबईत वकिली चालू ठेवावयाची आता मनाची तयारी नाही.' न्या. देशपांडे यांच्या मनावरचे प्रचंड ओझे आणि त्यामुळे दोलायमान होणारे त्यांचे मन मी समजू शकत होतो; पण माझ्यासारख्याची अवस्था विचित्र झाली होती. आमचा एक पाय मुंबईत आणि एक औरंगाबादेत होता. न्यायपीठ झालेच नाही तर औरंगाबादेत जिल्हा न्यायालयातसुद्धा वकिली करण्याचा विचार माझ्या मनात डोकावत होता.

मुंबईत मला फक्त अडीच-पावणेतीन वर्षे काम करावयास मिळाले. पण या अल्पावधीत मला लक्षात राहण्यासारखे अनेक वकील भेटले. त्यांच्या तऱ्हा पहावयास मिळाल्या आणि शिकावयासही मिळाल्या. मी मुंबईत आल्यानंतर पहिल्या काही दिवसांत भेटलेल्या वकिलांपैकी काहींनी मुद्दाम घरी बोलावून माझा परिचय करून घेतला. दुधाट (जे पुढे न्यायाधीश झाले) यांनी तर 'मुंबईत कित्येकवेळा प्रारंभीच्या काळात पैशाची अडचण येऊ शकते. तशी काही निर्माण झाली तर विनासंकोच मला सांगा.

केव्हाही तुम्ही ते परत करू शकता, असेही सांगितले.' मराठवाड्याबाहेरील मुंबईत असलेल्या अनेक वकिलांना आमच्याविषयी आस्था होती. डॉ. बी.आर. नाईक आणि हिंदू कॉलनीत राहणारे लिमये यांच्यासारखे काही वकील मृदू बोलण्याचे आदर्श होते. नाईकांनी मुद्दा सोडला नाही तरी त्यांचा आवाज चढला असे मी कधीच पाहिले नाही. लिमये थोडावेळ न्यायाधीशाला सांगून पाहत आणि त्याला पटले नाही तर लगेच खाली बसत. मराठवाड्यातले एक जुने वकील प्रत्येक केसमधील आपले विवेचन 'माझा पक्षकार फार गरीब आहे' या वाक्यापासून करीत. त्यांचे बहुतेक पक्षकार गरीबच असत हे खरे; परंतु पक्षकार गरीब असण्याचा खटल्याच्या गुणवत्तेवर काहीच परिणाम होत नसतो- त्यांचे हे नेहमीचे वाक्य ऐकून एका मिस्किल न्यायाधीशांनी 'पक्षकार पूर्वीपासून गरीब आहे का तुमच्याकडे आल्यानंतर गरीब झाला' असा प्रश्न त्यांना एकदा विचारला होता. असेच एक वकील स्वभावाने सज्जन पण न्यायालयासमोर काम करायला घाबरणारे होते. सकाळीच न्यायालयाच्या वेळेपूर्वी तासभर गाऊन घालून ते वकिलांच्या खोलीत फेऱ्या मारत. न्यायाधीश आसनावर बसण्यापूर्वी कोर्टातही जाऊन येत. प्रत्यक्ष प्रकरण निघे तेव्हा मात्र ते कोर्टात न जाता आपल्या सहकाऱ्याला प्रकरण चालवण्यास पाठवत. निकाल लागल्यानंतर तो अनुकूल असेल तर आपण कसे यश मिळवले याचे वर्णन करणारे पत्र पक्षकाराला पाठवीत. अतिशय टापटीपीचा पोशाख असणारे, फायलींच्यासाठीच नव्हे तर जेवणाच्या डब्यासाठीसुद्धा शानदार पिशव्या असणारे, दोन-तीन नोकर बरोबर बाळगणारे वकील होते; तसेच एक अफलातून वकील मी असेही पाहिले की जे दररोज आपले अख्खे दप्तर- सर्व फायली एका पोत्यात घालून कोर्टात येत. पोशाख असा असे की त्यात दहा-वीस तरी किरकोळ प्राणी जगत असावेत.

मनुष्यस्वभावाचे अनेक नमुनेही दिसत. खूप काम असलेला एखादा वकील घाईघाईने येई आणि माझे प्रकरण मी अगोदर काढून घेतो कारण दुसऱ्या कोर्टात जायचे आहे असे सांगे व सामान्यत: इतर सर्व वकील त्याला संमती देत. काही मात्र अपवाद असत. एक म्हातारे वकील मला आठवतात की ज्यांच्याकडे काम फारसे नव्हते. पण समजुतदारपणाही अजीबात नव्हता. वकीलच काय न्यायाधीशांनीसुद्धा एखाद्यावेळी तुमच्या अगोदर दुसऱ्याचे प्रकरण घेतो असे म्हटले तर हे लगेच विरोध आणि वादविवाद करू लागत. न्यायाधीशांनाही अशांचे स्वभाव माहीत झालेले असत. इतरांचे मात्र न्यायाधीशांना संपूर्ण साह्य असे. एखादे प्रकरण दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्याचा अर्ज हा सामान्यत: मजूरच करावयाचा असतो, अशा तांत्रिक गोष्टींसाठी मूळ प्रकरणाचे नुकसान करावयाचे नाही अशी बहुतेक न्यायाधीशांची समजूत होती. विरुद्ध बाजूचा वकील अशावेळी मुकपणे उभा राही. त्याचा विरोध औपचारिकरीत्या त्याचा विरोध न्यायाधीश निकालपत्रात नोंदवीत आणि मुदत माफ करीत. विरुद्ध बाजूचा वकील जर ज्येष्ठ किंवा माहितीचा असेल तर तो येईपर्यंतसुद्धा वाट पाहण्याची गरज नसे. कोर्टाचा वेळ आणि न्यायाधीशाची बुद्धी मूळ प्रकरणाचा निकाल करण्यासाठी वापरावी, किरकोळ तांत्रिक कामासाठी नव्हे असे बहुतेक सर्वजण मानीत.

वकिलीतल्यासुद्धा काही क्लुप्त्या होत्या. तात्पुरत्या मनाई हुकूमाबद्दल जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरुद्ध त्यावेळी दिवाणी कामे चालवण्याच्या रीतीच्या कायद्यातील ११५ व्या कलमानुसार रिव्हीजन होई. तसेच घटनेच्या कलम २२७ प्रमाणे रिटही होई. रिव्हीजन आणि रिट यांच्यासाठी वेगवेगळे न्यायाधीश बसलेले असत. त्यातील जो अशा प्रकरणात हस्तक्षेप करण्याला अधिक अनुकूल असेल त्याच्यासमोर प्रकरण चालावे म्हणून काही हुशार वकील रिट करायाचे की रिव्हीजन करावयाचे हे ठरवीत. पुढे मग ११५ व्या कलमाच्या अधिकार मर्यादेचा संकोच केला गेला व ज्यात रिव्हीजन होते त्या प्रकरणात रिट अर्ज दाखल करून घेऊ नये असे ठरले. एखाद्या प्रकरणात तात्पुरता हुकूम आपल्या मागणीप्रमाणे मिळाला अगर फौजदारी प्रकरणात जामीन मिळाला तर मूळ प्रकरणातील कार्यालयीन आक्षेप तसेच ठेवावयाचे म्हणजे जामीन अगर तात्पुरता हुकूम बराच काळ उपभोगता येतो. त्यामुळे काही तज्ज्ञ वकील आक्षेपांच्याकडे लक्षच देत नसत. न्यायाधीशसुद्धा पूर्वी वकीलच असल्यामुळे त्यांना हे सर्व परिचयाचे असे. एखादा चतुर न्यायाधीश मग सर्व आक्षेपासहित आहेत तशी सगळीच प्रकरणे

सुनावणीला लावा असा हुकूम देई आणि मग तकलादू मुद्यावर मिळालेले प्राथमिक हुकूम रद्द होत आणि प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार ते दाखल किंवा खारीज होई.

वेस्टर्न इंडिया ॲडव्होकेटस् असोसिएशनमधील वातावरण फार चांगले होते. पण काही नियम हे कित्येकवेळा अन्याय करणारे ठरले. निवृत्त होणाऱ्या न्यायाधीशाला निरोप देण्यासाठी बोलावण्यास जर एकाही सदस्याने विरोध केला तर निरोप समारंभ होत नसे. अनेक चांगल्या व निस्पृह न्यायाधीशांनाही निरोप समारंभ न होण्याचे कारण एका कुठल्या तरी सभासदाने त्याला विरोध केला हे असे. इतर सर्व लोक अनुकूल असले तरी त्याचा उपयोग नसे. मुंबई उच्च न्यायालयासमोर वकिली करणारे बहुतेक नामवंत वकील ओरिजनल साईडला काम करत. ज्यांच्याकडे जिल्ह्यातून येणारे कामच अधिक आहे ते वेस्टर्न इंडियामध्ये असत. त्यातही अनेक अभ्यासू आणि चांगले वकील होते.

अंतिम सुनावणीची प्रकरणे दोन्ही वकिलांच्या संमतीने औरंगाबादला घेण्यास खंडपीठाने संमती दिली होती. परंतु प्रकरणे मुंबईलाच दाखल करावी लागणार होती. अशा परिस्थितीत औरंगाबादला न्यायपीठ स्थापन करावे का हा मुख्य न्यायाधीशांसमोर प्रश्न होता. मराठवाड्यातील वकिलांना सतत दुहेरी यात्रा करावी लागेल व त्रास होईल असेही त्यांना वाटत होते. हा त्रास आपण सध्या सहन करू मात्र शेवटी पूर्ण अधिकार असलेले न्यायपीठ औरंगाबादला स्थापन होईल ही आम्हा वकिलांना मनोमन खात्री वाटत होती. मराठवाड्यातील सर्वच वकिलांनी एकमुखाने तुम्ही न्यायपीठ स्थापन कराच असे मुख्य न्यायाधीशांना सांगितले.

२५ ऑगस्ट रोजी सायंकाळी मुख्य न्याधीशांनी सध्याच मी न्यायपीठ स्थापन करावयाचे नाही असे ठरवतो आहे असे सांगितले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही तुम्हाला भेटतो असे आम्ही सगळ्यांनी कळवले व सकाळी साडेसातच्या सुमाराला मराठवाड्यातील पंचवीस-तीस वकील मुख्य न्यायाधीशांच्या घरी गेलो. आमच्यापैकी काहींनी शेजारीच राहणाऱ्या व तेव्हा मंत्री असलेल्या शिवाजीराव निलंगेकरांना बोलावून आणले होते. थोडावेळ न्यायमूर्ती मुरलीधरराव कानडेही तेथे येऊन गेले. आम्हा सर्वांचे औपचारिक स्वागत करून व चहाची व्यवस्था करून न्या. देशपांडे आतल्या खोलीत गेले होते. त्यांच्यासाठी त्यांच्या जीवनातील सर्वात जास्त तणावाचा दिवस होता. सर्वांनी एकत्र जमून न्यायपीठाची गरज पटवावी आणि या अवघड निर्णयाच्या प्रसंगी आपण न्या. देशपांडे यांच्याबरोबर आहोत हेही दाखवावे असा आमचा हेतू होता. मध्यंतरी एका कार्यक्रमाला मुख्य न्यायाधीशांना जावयाचे होते. ते जवळजवळ दोन तासांनी परत आले तोपर्यंत कोणीही हललेले नव्हते. शेवटी दुपारी एकच्या सुमाराला न्या. देशपांडे यांनी न्यायपीठ स्थापन करण्याचा आपण निर्णय केला आहे असे सांगितले. लगेच कायदामंत्री, महाअधिवक्ता आणि उच्च न्यायालयाचे प्रबंधक तेथे आले. निर्णयाची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू झाली. दुसऱ्या दिवशी म्हणजे २७ ऑगस्ट १९८१ दुपारी न्यायपीठाची अधिकृत स्थापन औरंगाबादला होणार होती. तत्पूर्वी सर्वांना तेथे पोहोचावयाचे होते. न्यायाधीश, मंत्री आणि प्रबंधक यांच्यासाठी विमानाची तिकीटे मिळवण्याची धावपळ सुरू झाली. इतरांना जागा मिळण्याचा संभव कमी होता. वकीलाबरोबरच हायकोर्टाच्या कर्मचाऱ्यांनाही औरंगाबादला पोहोचणे आवश्यक होते. राज्य मार्गपरिवहन महामंडळाने एक आराम बस उपलब्ध करून दिली आणि त्यात पंधरा-वीस वकील आणि सात-आठ कर्मचारी असे आम्ही औरंगाबादला २७ तारखेला सकाळी पोहोचलो.

घर तर मी पूर्वीच हलवले होते. सामानही दोन दिवसांपूर्वीच पाठवले होते. आता पुन्हा एकदा औरंगाबादला वकिली सुरू करावयाची होती.

---

लेखात मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीचे रेखाचित्र तयार करवून वापरावयाचे आहे. त्यासाठी छायाचित्र चित्रकाराला आधारासाठी पाठवता येईल.

लेखकाचा पत्ता :न्या. नरेन्द्र चपळगावकर, १३, जयनगर, औरंगाबाद - ४३१ ००५ (महाराष्ट्र)
दूरध्वनी : ०२४०- २३३११६६. मो. ९४२२७१२१२१

ंअठराव्या शतकात महाराष्ट्रात प्रचलित धर्मव्यवहाराला दोन मुख्य पदर होते. कर्मकांडाला प्राधान्य असलेले धर्माचरण शहरात, मोठ्या गावात राहणारे जातीसमूह आचारित होते. अनेक सामाजिक रुढी, चालीरीती, व्यक्तिजीवनातील आचार यांना धर्माचे अधिष्ठान मिळवून देण्यात आले होते. कर्मकांडाच्या योग्यायोग्यतेला निर्णय ब्राह्मण पुरोहित वर्गाच्या हातात होता. राजसत्ता काही वेळा हे कठोर आचारनियम शिथिल करावयास भाग पाडीत असली तरी पेशवाईच्या शेवटच्या काळात प्रगतीशील निर्णय घेण्याचे, रुढीत बदल करण्याचे धर्मसंस्थेचे सामर्थ्य कमी कमी होत गेले. राजसत्ता धर्माचार्यांच्या आधिन झाली व रुढींना अधिक बळ प्राप्त झाले. परंपरांचे सवत पुनर्विलोकन होण्याची प्रक्रिया थांबली व धर्मनियंत्रित समाजव्यवस्थेला एक साचलेपण आले. दुसरीकडे भागवत संप्रदाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, विविध जातींच्या संतांनी आध्यात्मिक नेतृत्व दिलेला भक्तिसंप्रदायाने सामान्य जनतेच्या भावविश्वात नेतृत्व दिलेला भक्तिसंप्रदायाने सामान्य जनतेच्या भावविश्वशात